**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर, राज्यातल्या ७ जागांचा समावेश

- वापरून झालेल्या पेट प्लास्टिकच्या बाटल्या रिसायकल करण्यासाठी राज्यातल्या ९ शहरांमधे महा -आर- पेट मोहीम राबवली जाणार

- अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी पूर्ण होईपर्यंत नागरी हवाई वाहतूक मंत्र्यांना पदावरून दूर करावं, अशी रोहित पवार यांची मागणी

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत नेदरलँडसबरोबरच्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा भारताचा निर्णय

**<><><><><>**

राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकांची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं आज केली. यात राज्यातल्या ७ जागांचा समावेश आहे.

शरद पवार, रामदास आठवले, डॉ.भागवत कराड, डॉ.फौजिया खान, धैर्यशील पाटील, रजनी पाटील आणि प्रियंका चतुर्वेदी, या सात सदस्यांचा कार्यकाळ येत्या २ एप्रिल रोजी संपणार आहे. या रिक्त जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीची अधिसूचना २६ फेब्रुवारी रोजी जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ मार्च तर ६ मार्च ला उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ९ मार्चपर्यंत आहे. १६ मार्चला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे.

महाराष्ट्राबरोबरच ओदिशा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतही राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक होणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा आणि इतर कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्यानंतर आज फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ आणि त्यांच्या पत्नी ब्रिजिट मुंबईहून दिल्लीला रवाना झाले. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर मॅक्राँ याना निरोप दिला.

<><><><><>

वापरून झालेल्या पेट प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून रिसायकल करण्यासाठी राज्यातल्या ९ शहरांमधे महा -आर- पेट मोहीम राबवण्यात येणार आहे. मुंबई क्लायमेट वीक दरम्यान राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत याबाबतच्या समझोता करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. त्यानुसार हिंदुस्तान कोकाकोला बेव्हरेजेस ही कंपनी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड आणि पालघर इथं ही मोहीम राबवणार आहे. या मोहिमेअंतर्गत पर्यावरणाला प्लास्टिक कचऱ्यामुळे उद्भवणारा धोका, तसंच प्लास्टिक कचऱ्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट याविषयी जनजागृती करण्यात येईल. प्लास्टिक गोळा करण्यासाठी दुकानं, उपाहारगृहं, आणि इतर सार्वजनिक ठिकाणी संकलनकेंद्र सुरु केली जातील, तसंच शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि बिगरसरकारी संस्थांशी समन्वय साधून ही मोहीम राबवली जाईल.

राज्याच्या हवामानविषयक आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी क्लायमेट ट्रेड या कंपनीशी देखील करार करण्यात आला आहे.

मुंबई क्लायमेट वीकमधे आज शून्य उत्सर्जन इमारत बांधकाम, आणि छतावर सौरऊर्जा प्रकल्प, तसंच सांडपाणी व्यवस्थापनावरच्या दोन अहवालांचं प्रकाशन पर्यावरण मंत्र्यांच्या हस्ते झालं.

पर्यावरणसंरक्षणाच्या कार्यासाठी देण्यात येणाऱ्या द अर्थहोस्ट पुरस्काराचा वितरण सोहळा यंदा मुंबईत होईल असंही आज क्लायमेट वीक परिषदेत जाहीर झालं. ब्रिटनचे राजपुत्र विल्यम यांनी २०२० पासून हा पुरस्कार सुरु केला आहे.

<><><><><>

माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी पूर्ण होईपर्यंत नागरी हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांना पदावरून दूर करावं, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. अजित पवार यांचं अपघातग्रस्त विमान व्हीएसआर कंपनीच्या मालकीचं होतं. या कंपनीचे मालक आणि राममोहन नायडू यांचे निकटचे संबंध असल्यानं त्यांना पाठीशी घातले जात असल्याचा आरोपही पवार यांनी केला.

बारामती इथं २८ जानेवारीला झालेल्या विमान दुर्घटनेबाबत अद्याप प्राथमिक चौकशी अहवालही आलेला नाही आणि व्हीएसआर कंपनीला वाचवण्याचा प्रयत्न होत आहे, अशा शंका पवार यांनी व्यक्त केली.

दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ आणि पार्थ पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अलिकडेच भेट घेत या अपघाताची सीबीआय चौकशी करावी, अशी मागणी पत्राद्वारे केली.

<><><><><>

महाराष्ट्रात शिक्षण आणि नोकऱ्यांमधे मुस्लिम समाजासाठीचं पाच टक्के आरक्षण सरकारनं रद्द केलं आहे, त्यामुळे विशेष मागास प्रवर्ग अ या प्रवर्गातल्या मुस्लीम समाजाला जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र

याबाबतचा शासन निर्णय आणि परिपत्रक रद्द करणारा शासन निर्णय ऱाज्यशासनानं काल जारी केला. राज्यातल्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारनं मराठा समाजासाठी १६ टक्के आणि मुस्लिम समाजासाठी ५ टक्के आरक्षणाची तरतूद करणारा अध्यादेश काढला होता. त्या अध्यादेशाचं कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे तो व्यपगत झाला आहे, त्यामुळे त्याबाबतचा जीआर आणि परिपत्रक रद्दबातल झाल्याचं कालच्या जीआरमधे म्हटलं आहे.

राज्यातलं महायुती सरकार अल्पसंख्याक विरोधी असल्याची टीका काँग्रेसच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य नसीम खान यांनी केली आहे. मुस्लिमांसाठीचं ५ टक्के आरक्षण या सरकारन पुढं चालू ठेवलं नाही, तसंच अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीसह अनेक कल्याणकारी योजना थांबवल्या असल्याचा आरोप त्यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत केला.

<><><><><>

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झाल्यानंतर शासकीय दुखवटा असताना राज्यातल्या ७५ शैक्षणिक संस्थांना घाईघाईनं अल्पसंख्याक दर्जा दिल्याप्रकरणी अल्पसंख्याक विकास विभागाचे उपसचिव मिलिंद शेणॉय यांना पदावरुन हटवलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या निर्णयाला स्थगिती दिल्याच्या दुसऱ्याच दिवशी ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी कोणती प्रक्रिया राबवली गेली, अल्पसंख्याक दर्जा देण्यावरची स्थगिती उठवली होती का, हे तपासण्यासाठी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. दरम्यान शेणॉय यांना इतर कुठंही नेमणूक दिलेली नाही.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अ गटात भारताचा सामना नेदरलँडसबरोबर होत आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर संध्याकाळी ७

वाजता हा सामना सुरु होईल. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

अ गटातच आज श्रीलंकेत कोलंबो इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात पाकिस्ताननं नामिबियावर १०२ धावांनी विजय मिळवला. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना, साहिबजादा फरहानच्या नाबाद शतकाच्या जोरावर, २० षटकात ३ गडी गमावून १९९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना नामिबियाचा संघ १८ व्या षटकातच ९७ धावात गारद झाला.

ड गटात दिल्लीत झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं संयुक्त अरब अमिरातीवर ६ गडी ४० चेंडू राखून विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. संयुक्त अरब अमिरातीनं २० षटकात ६ गडी गमावून १२२ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेनं ही धावसंख्या ४ गड्यांच्या मोबदल्यात १३ षटकं आणि २ चेंडूत पार केली.

<><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत पूर्व विजेत्या बंगालला हरवून जम्मू काश्मीरचा संघ प्रथमच उपांत्यफेरीत पोहोचला आहे. पश्चिम बंगालमधे कल्याणी इथं आज संपलेल्या या सामन्यात बंगालच्या संघाने विजयासाठी १२६ धावांचं आव्हान जम्मूकाश्मीरला दिलं होतं. ते ३४ षटकं आणि ४ चेंडूत ४ गडी गमावून जम्मूकाश्मीरने पूर्ण केलं.

<><><><>

राज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर बनले आहेत, बेरोजगारी वाढली आहे, महिला अत्याचाराचं प्रमाण वाढलं आहे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला आहे, मात्र केंद्र आणि राज्यातलं भाजपा सरकार केवळ राजकारण करत असून या प्रश्नांकडे सरकारचं बिलकुल लक्ष नाही अशी टीका काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली. रमेश चेन्निथला यांच्या उपस्थितीत आणि प्रदेशाध्यक्ष

हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसची बैठक आज मुंबईत टिळक भवनात झाली, त्यानंतर चेन्निथला वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेस पक्ष जनतेचे प्रश्न घेऊन राज्यभरात आंदोलनं, मोर्चे काढून सरकारला जाब विचारणार असल्याचं चेन्निथला यावेळी म्हणाले. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत विचारलं असता या निवडणुकीत प्रशासकीय यंत्रणांचा आणि पैशांचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाला, असा आरोप त्यांनी केला.

<><><><><>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर तयार होणाऱ्या फेडएक्स टर्मिनल हबमुळे राज्यातल्या मालवाहतुकीला चालना मिळेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. या हबचं भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. देशाची आर्थिक, व्यापारी तसंच मनोरंजन क्षेत्राची राजधानी असणाऱ्या मुंबई एमएमआर क्षेत्रात हे विमानतळ असल्याने भारताच्या भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचं असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

कोकण किनारपट्टी आणि पठारावर आढळणाऱ्या हजारांपेक्षा जास्त प्राचीन कातळशिल्पांचं सखोल संशोधन, दस्तऐवजीकरण आणि त्यांच्या संरक्षणासाठी वर्ल्ड हेरिटेज डेस्कची स्थापन करण्यात आल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी दिली आहे. यासाठी राज्य शासनाने १४ कोटी ६२ लाखांहून अधिक खर्चाला मान्यता दिली आहे. याअंतर्गत क्षेत्रीय सर्वेक्षण, जीपीएस आधारित त्यांचे नकाशे निश्चित केले जातील, तसंच त्यांच्याशी संबंधित स्थानिक लोककथांचं संकलन करण्यात येईल. प्रकल्पाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई यांच्याकडे असेल, असं शेलार म्हणाले.

<><><><><>

गेल्या २४ तासात उत्तर महाराष्ट्रात किमान तापमानात लक्षणीय वाढ तर उत्तर कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**